**केंद्र शासनाच्या “राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य २०२६-२७” या योजनेच्या भाग-१ अंतर्गत पहिल्या हप्त्याचा निधी पुर्नवाटप करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सिआयडी-३३२६/प्र.क्र.१३३/नवि-१०**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ ऑक्टोबर, २०२६

<u>वाचा</u> :-

१) भारत सरकार,वित्त मंत्रालय यांचे पत्र क्र.F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७ (CAPEX), दि.२७.०३.२०२६.
२) भारत सरकार,वित्त मंत्रालय यांचे पत्र क्र.F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७ (CAPEX)-Maharashtra, दि.२९.०७.२०२६.
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३५/कोषा प्रशा-४, दि.०१.०७.२०२१.
४) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. सिआयडी-३३२५/प्र.क्र.३००/नवि-१०, दि.०९.०१.२०२६.
५) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२२/अर्थबळ दि.०४.०८.२०२६.
६) समक्रमांक शासन निर्णय, दि.०७.०८.२०२६.

**<u>प्रस्तावना</u> :-**

केंद्र शासनाच्या "राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य २०२६-२७" या योजनेंतर्गत राज्य शासनास भांडवली गुंतवणूक प्रकल्पांसाठी ५० वर्षांच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरूपात विशेष आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येत आहे. यासंदर्भात केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाने दि.२७.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये उक्त योजनेची मार्गदर्शक तत्वे विहित केली आहेत. या योजनेंतर्गत सुरु असलेल्या कामांना चालु वर्षी उपरोक्त योजनेच्या भाग-१ अंतर्गत निधी देण्याचा प्रस्ताव नगर विकास विभागाने वित्त विभागामार्फत केंद्र शासनास पाठविला होता. केंद्र शासनाच्या दि.२९.०७.२०२६ रोजीच्या आदेशान्वये सदर प्रकल्पांना मंजुरी दिली असून रु.१३२.६६६६/- कोटी इतका पहिल्या हप्त्याचा निधी संदर्भाधीन क्र.६ येथील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. परंतू, वितरीत निधीपैकी काही तांत्रिक अडचणीमुळे काही अंमलबजावणी यंत्रणांना सदर वितरित निधी विहित वेळेत खर्च करणे शक्य होणार नसल्याने सदरचा निधी अन्य अंमलबजावणी यंत्रणांना पुर्नवाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> : -**

केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य २०२६-२७ या योजनेच्या भाग-१ अंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या निधीनुसार पहिल्या हप्त्याचा निधी **रु. १३२,६६,६६,०००/-(अक्षरी रुपये एकशे बत्तीस कोटी सहासष्ट लक्ष सहासष्ट हजार फक्त)** सन २०२६-२७ या चालू वित्तीय वर्षामध्ये खर्च करण्यासाठी संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना संदर्भाधीन क्र.६ येथील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. सदर निधी विहित वेळेत खर्च करण्यामध्ये काही नगरपरिषद / नगरपंचायत यांना

अडचण असल्याने व वितरीत केलेल्या निधीपैकी ७५ टक्के खर्चाची उपयोगीता प्रमाणपत्रे वित्त विभागास सादर करणे आवश्यक असल्याने त्यांना वितरीत केलेला निधी तात्पुरत्या स्वरुपात अन्य नगरपरिषद / नगरपंचायत यांच्या मंजूर प्रकल्पांना खालीलप्रमाणे पुर्नवाटप करण्यात येत आहे.

(रु.कोटीत)

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव | अंमलबजावणी यंत्रणा | वितरीत केलेली रक्कम | पुर्नवितरीत करावयाची रक्कम | एकूण अंतिम वितरण |
|---|---|---|---|---|---|
| १. | Construction of १५.०० m & १२.०० wide DP Road | नगरपंचायत सेनगाव | १०.०० | (+) २.०० | १२.०० |
| २. | Beatification of Rushiswar Garden in Reservation No.२९ of S.No.१२३९ | नगरपरिषद नरखेड | ३.०० | (-) २.०० | १.०० |
| ३. | Construction of  Road from Makhria Highschool to Tapola road and Bridge within council limit | नगरपरिषद महाबळेश्वर | २.०० | (+) २.०० | ४.०० |
| ४. | Construction of   Tapola road to jannimata socitey roads to old satatra roads | नगरपरिषद महाबळेश्वर | २.०० | (+) १.०० | ३.०० |
| ५. | Construction of Cement concrete road and RCC Gutter Concil Jalkot nation highway ५० to deglur road Municipal Council Limit. | नगरपरिषद उदगीर | २.५० | (+) ३.०० | ५.५० |
| ६. | Construction of Cement concrete road and RCC Gutter Council Jalkot Road (Manlyar building) to Dhanvantri College Road Muncipal Council Limit. | नगरपरिषद उदगीर | ३.०० | (-) ३.०० | ०.०० |
| ७. | Construction of cement concrete DP road and gutter | नगरपरिषद गंगाखेड | ६.०० | (-) २.५० | ३.५० |
| ८. | Construction of Parking Reservation No. ११ | नगरपरिषद कुळगाव-बदलापूर | ३.५० | (-) ०.५० | ३.०० |
| | | | **३२.००** | **००** | **३२.००** |

०२. संदर्भाधीन क्र.६ येथील शासन निर्णयातील अन्य अटी व शर्ती कायम राहतील.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६१०१९१६१२०४९०२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUBRAO NARAYAN SHINDE

Digitally signed by SUBRAO NARAYAN SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Urban Development Department,
2.5.4.20=FFA7B5A27FAED7560194E6272933CFA60DCA1EB8AB54859EAE7920C9D0D1F622, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E5BB5862D0E131A274D92F7A1ACEF953E01301C1B0FB615DC6CCE4812BDED257, cn=SUBRAO NARAYAN SHINDE
Date: 2026.10.19 16:13:40 +05'30'

**( सुबराव शिंदे )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय, मुंबई.
९. संचालक, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, पुणे.
१०. सहाय्यक संचालक, विभागीय कार्यालय (पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, कोकण, छ.संभाजीनगर)
११. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सेनगाव, नरखेड, महाबळेश्वर, उदगीर, गंगाखेड, कुळगाव-बदलापूर)
१२. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, मुंबई / नागपुर
१३. महालेखापाल, (लेखापरिक्षा)- १/२, मुंबई/ नागपुर
१४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६. उप सचिव (नवि-४, नवि-३१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. निवड नस्ती (नवि-१०).